




दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २७० •सोमवार, दि.२९ डिसेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955




# मोठी बातमी ! अखेर शिवसेना-भाजपची युती तुटली, संपूर्ण राज्यात खळबळ

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील २९ महानगर पालिकांच्या निवडणुकीची घोषणा झाली आहे. राजकीय पक्ष मोर्चेबांधणीत व्यस्त आहेत. युती-आघाडीसाठीच्या बैठकांना वेग आला आहे. तर काही ठिकाणी जागावाटपांची चर्चा अंतिम टप्प्यात आली आहे. शिवसेना आणि भाजपने मुंबई महापालिका निवडणुकीसाठी युती केली आहे. मात्र इतर ठिकाणी हे दोन्ही पक्ष आपापल्या सोयीनुसार इतर पक्षांसोबत युतीत किंवा स्वतंत्र लढताना दिसत आहेत. अशातच आता अमरावतीतून मोठी बातमी समोर आली आहे. भाजप आणि शिवसेनेत सुरू असलेली युतीची बोलणी फिस्कटली आहेत. त्यामुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

अमरावतीत सेना-भाजपची युती तुटली : अमरावती महानगरपालिका निवडणुकीमध्ये भाजप आणि शिवसेना एकत्रित लढणार अशी चर्चा काही दिवसांपासून सुरू होती, मात्र आता भाजप आणि शिवसेनेची युती तुटली असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. त्यामुळे संपर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. शिवसेनेने भाजपकडे पंचवीस जागांची मागणी केली होती, मात्र हा प्रस्ताव भाजपने नाकारला असल्याची माहिती समोर आली आहे. तर दुसरीकडे भाजप ८७ पैकी १५ ते १६ जागा शिवसेनेला देण्यास तयारी होती अशीही माहिती समोर आली आहे. मात्र आता दोन्ही पक्षांमध्ये युती होऊ शकलेली नाही. अमरावती महानगरपालिकेसाठी १५ जानेवारीला मतदान पार पडणार आहे, तर १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे. सध्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याने सर्वच पक्ष व्यस्त आहेत. राज्यात भाजप आणि शिवसेनेची युती आहे, मात्र अमरावतीत या दोन्ही पक्षांनी वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे आता मतांचे विभाजन झाल्यास दोन्ही पक्षांना फटका बसण्याची शक्यता आहे. अशातच आता शिवसेनेचे नेते अभिजीत अडसूळ साडेपाच वाजता महत्त्वाची पत्रकार परिषद घेणार असल्याचीही माहिती समोर आली आहे.

### ● २०१७ चा निकाल काय ?

**२०१७ च्या निवडणुकीत भाजपने विजय मिळवला होता. ४५ जागा जिंकत भाजला बहुमत मिळाले होते, त्यामुळे चेतन गावंडे यांच्या गळ्यात महापौर पदाची माळ पडली होती. २०१७ साली काँग्रेसने १५, शिवसेनेने ७, असदुद्दीनं ओवैसी यांच्या एमआयएमने १०, मायावती यांच्या बहुजन समाज पार्टीने ५, रवी राणा यांच्या युवा स्वाभिमानचे ३ जागांवर विजय मिळवला होता. तर आरपीआय आठवले गटाने एका जागेवर आणि अपक्ष उमेदवाराने एका जागेवर विजय मिळवला होता.**

# अंबाजोगाईकरांना मोठा दिलासा; 'गवळीपुरा' नवीन फीडर कार्यान्वित

## आ. नमिता मुंदडांच्या प्रयत्नांमुळे अखंडीत विद्युत पुरवठ्यासाठी यशस्वी नियोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहर आणि परिसरातील वीज ग्राहकांसाठी एक अत्यंत आनंदाची आणि महत्त्वाची बातमी आहे. गेल्या अनेक दिवसांपासून वीज पुरवठ्यात येणारे तांत्रिक अडथळे आणि लो-व्होल्टेजची समस्या दूर करण्यासाठी महावितरणने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. अंबाजोगाई उपविभागांतर्गत ३३ केव्ही उपकेंद्रामधून निघणाऱ्या ११ केव्ही मोरेवाडी फीडरचे यशस्वीरीत्या विभाजन करण्यात आले आहे. शनिवारी (दि. २७) '११ केव्ही



गवळीपुरा' हे नवीन फीडर कार्यान्वित करण्यात आले आहे. या महत्त्वाच्या कामामुळे शहर व ग्रामीण ▶ उर्वरित पान २ वर

### ● ट्रिपिंग थांबणार, मिळणार अखंडीत विद्युत पुरवठा

**नवीन फीडर कार्यान्वित झाल्यामुळे या भागातील वीज यंत्रणेवर असणारा भार आता विभागला गेला आहे. यामुळे यापूर्वी वारंवार होणारे 'ट्रिपिंग' आता पूर्णपणे थांबणार असून ग्राहकांना उच्च दाबाने (स्टेबल व्होल्टेज) वीज मिळणार आहे. विशेषत: उन्हाळ्यात किंवा अधिक वापराच्या काळात वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण नगण्य होईल. फीडरच्या विभाजनामुळे जर एखाद्या भागात तांत्रिक बिघाड झाला, तर तो शोधणे आणि दुरुस्त करणे महावितरणच्या कर्मचाऱ्यांना आता अधिक सुलभ आणि जलद होणार आहे. याचा थेट फायदा घरगुती ग्राहकांसोबतच व्यापारी आणि विद्यार्थ्यांना होणार असून, अखंडित वीज पुरवठ्यामुळे अंबाजोगाईकरांची मोठी सोय झाली आहे. महावितरणच्या या निर्णयाचे आणि आमदार नमिता मुंदडा यांच्या प्रयत्नांचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.**

# अराजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांना वयोमर्यादेत एक वर्षाची सवलत द्या

## धनंजय मुंडे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे विनंती

**मुंबई । प्रतिनिधी**

अराजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा - २०२५ अंतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात ७ महिने उशिरा अर्थात जुलै २०२५ मध्ये प्रसिद्ध करण्यात आली असून, त्यानंतर उमेदवारांना वयोमर्यादा निश्चितीसाठी १ नोव्हेंबर, २०२५ ही तारीख निश्चित केल्याने अनेक उमेदवार या परीक्षेत वयोमर्यादा ओलांडल्याने अपात्र होतील, त्यामुळे या परीक्षेसाठी इच्छुक उमेदवारांना वयोमर्यादेत एक वर्षाची सवलत द्यावी किंवा त्यानुसार वयोमर्यादा निश्चितीची तारीख बदलण्यात यावी, अशी विनंती माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे केली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या अराजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा



२०२५ अंतर्गत पोलिस उपनिरीक्षक पदाच्या परीक्षेसाठी दि. २९ जुलै, २०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून त्यासाठी परीक्षार्थींची वयोमर्यादा ग्राह्य धरण्यासाठी दि. ०१ नोव्हेंबर, २०२५ ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. सदर जाहिरात नियमित प्रघाताप्रमाणे अपेक्षित वेळेच्या ७ महिने उशिरा प्रसिद्ध झाली असून, वयोमर्यादा ग्राह्य धरण्यास दिलेल्या तारखेमुळे सदर परीक्षेस अनेक परीक्षार्थी वयोमर्यादा ओलांडल्याने अपात्र ठरत आहेत. यापूर्वी मागील वर्षी अशाच स्वरूपाची जाहिरात उशिरा प्रसिद्ध झाल्याने राज्य शासनाने स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करून उमेदवारांना एक वर्षाची सवलत प्रदान केली होती. तसेच याच वर्षीच्या पोलिस शिपाई भरतीमध्ये सुद्धा वय सवलत देण्यात आली होती. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन अराजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ अंतर्गत पोलिस उपनिरीक्षक पदासाठी इच्छुक परीक्षार्थींना एक वर्ष वयाची सवलत देण्यात यावी किंवा त्यानुसार वयोमर्यादा ग्राह्य धरण्याच्या तारखेत बदल करण्यात यावा, अशी विनंती धनंजय मुंडे यांनी त्यांच्या पत्रात केली आहे.

# मराठी अभिनेत्रीला दीड कोटींची खंडणी घेताना पकडलं रंगेहाथ; बिल्डरकडून गुन्हा दाखल

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई पोलिसांच्या खंडणीविरोधी पथकाने गोरेगाव इथल्या एका बिल्डरकडून १० कोटी रुपयांची खंडणी मागितल्याच्या आरोपावरून दोन महिलांना अटक केली आहे. याच खंडणीचा पहिला हप्ता दीड कोटी रुपये स्वीकारताना या महिलांना मुंबई गुन्हे शाखेने रंगेहाथ पकडलं. खंडणी प्रकरणात मराठी अभिनेत्री हेमलता पाटकर यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटकेतल्या दोन्ही महिलांना सोमवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.



पहिल्या पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर आरोपींना शनिवारी एस्प्लेनेड न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. त्यानंतर न्यायालयाने त्यांना सोमवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

मराठी अभिनेत्रीविरोधात गुन्हा- अटक करण्यात आलेल्या आरोपींची ओळख कांदिवली इथल्या ▶ उर्वरित पान २ वर

# बीडमध्ये बस आणि दुचाकीचा भीषण अपघात ; एकाचा जागीच मृत्यू

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात रविवारी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एमएसआरटीसी) बस आणि मोटारसायकल यांच्यात झालेल्या धडकेत एका ५० वर्षीय स्वाराचा मृत्यू झाला तर त्याच्यामागे बस असलेला व्यक्ती गंभीर जखमी झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. हा अपघात सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास मांजरसुंबा-अंबाजोगाई मार्गावर, येथून सुमारे ३० किमी अंतरावर असलेल्या सावंतवाडी चौकात झाला, असे त्यांनी सांगितले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नांदेड जिल्ह्यातील एमएसआरटीसीच्या देगलूर डेपोची बस विरुद्ध दिशेने येणाऱ्या मोटारसायकलला धडकली. या अपघातात किशोर निर्मल नावाचा स्वार जागीच मृत्युमुखी पडला, तर मागे बसलेला सुनील जाधव (५०) गंभीर जखमी झाला. जाधव यांना सुरुवातीला स्थानिक रुग्णालयात नेण्यात आले आणि नंतर बीड जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. नेकनूर पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली आणि तपास सुरू केला, असेही त्यांनी सांगितले.

# 'प्रियंका घरी परत ये...', पतीच्या गोड बोलण्याला भाळली अन् भयानक घडलं, पुणे हादरलं

**पुणे । प्रतिनिधी**

मुल होत नसल्यामुळे पतीने पत्नीची गळा दाबून हत्या केल्याची खळबळजनक घटना पुण्यात घडली आहे. पुण्याच्या हडपसरमधील भेकराई नगर भागात राहणाऱ्या जोडप्यामध्ये मुल नसल्यामुळे अनेकदा वाद व्हायचे. या वादाने शुक्रवारी टोक गाठलं आणि पतीने घरामध्येच पत्नीची गळा घोटून हत्या केली. आकाश विष्णू दोडके (वय ३५) असं आरोपी पतीचं नाव आहे. आरोपी आकाशने त्याची पत्नी प्रियंका आकाश दोडके (वय २७) हिची



राहत्या घरी हत्या केली.

पत्नीची हत्या केल्यानंतर पती लगेच जवळच्या पोलीस स्टेशनला गेला आणि आपण पत्नीचा खून केल्याचं त्यांनी पोलिसांना सांगितलं. यानंतर फुरसुंगी पोलिसांनी आरोपी पतीला तातडीने ताब्यात घेतले आणि घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी पोहोचल्यानंतर पोलीस अधिकाऱ्यांना घरात महिलेचा मृतदेह आढळला. यानंतर पोलिसांनी पतीविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. तसंच केस आणखी मजबूत करण्यासाठी पोलीस जबाबाच्या नोंदी करत आहेत. महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. प्रियंका आणि आकाश दोडके यांचं लग्न १८ फेब्रुवारी २०१८ रोजी झालं होतं, पण लग्नाच्या सात-आठ वर्षांनंतरही दोघांना मुल होत नव्हतं, ▶ उर्वरित पान २ वर

# केजमध्ये महसूल विभागाच्या आवारातून ट्रॅक्टर लंपास ;

## सीसीटीव्हीच्या आधारे चोराचा शोध सुरू

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये अवैध गौण खनिज माफियांनी आता थेट प्रशासनालाच आव्हान देण्यास सुरुवात केली आहे. केज येथे महसूल विभाग आणि पोलिसांनी संयुक्त कारवाई करत ताब्यात घेतलेला वाळू/मुरुमाचा ट्रॅक्टर चक्क सरकारी कार्यालयाच्या आवारातून पळवून नेल्याची खळबळजनक घटना घडली आहे.

नेमकी घटना काय? दिनांक २५ डिसेंबर रोजी रात्रीच्या सुमारास केज-कळंब रोडवर मुरूमाची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती महसूल प्रशासनाला मिळाली होती. महसूल कर्मचाऱ्यांनी तत्परता दाखवत पोलिसांना पाचारण केले आणि रात्री ११ वाजेच्या सुमारास हा ट्रॅक्टर (ट्रॉलीसह) ताब्यात घेतला. ही जप्त केलेली वाहने सुरक्षिततेसाठी सरकारी कार्यालयाच्या परिसरात उभी करण्यात आली होती.

बनावट चावीचा वापर आणि पलायन- कारवाई झाल्याचे समजताच संबंधित माफियाने किंवा त्याच्या साथीदाराने रात्रीच्या अंधाराचा फायदा घेतला. धक्कादायक बाब म्हणजे, या अज्ञात व्यक्तीने बनावट चावीचा वापर करून कार्यालयाच्या परिसरात उभा असलेला ट्रॅक्टर आणि ट्रॉली स्टार्ट केली आणि तिथून पळवून नेली. सकाळी जेव्हा महसूल कर्मचाऱ्यांच्या ही बाब लक्षात आली, तेव्हा एकच खळबळ उडाली.

सीसीटीव्ही ठरणार गेमचेंजर- प्रशासनाच्या ताब्यातून वाहन पळवून नेल्यामुळे आता पोलीस या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहत आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ▶ उर्वरित पान २ वर

# भाजपा जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीच्या अनुषंगाने बैठक संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

बीडमध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती आणि मार्गदर्शन बैठकीचे आयोजन रविवारी (दि.२८) करण्यात आले. यावेळी इच्छुकांची प्रचंड गर्दी झाल्यामुळे थेट मुलाखतीऐवजी अर्ज स्वीकारण्याच्या सूचना निरीक्षकांनी केल्या. त्यानंतर ▶ उर्वरित पान २ वर

### इच्छुकांची प्रचंड गर्दी

**निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांची सभागृहात प्रचंड गर्दी झाल्यामुळे निरीक्षकांच्या सूचनेवरून इच्छुकांचे केवळ अर्ज स्वीकारण्यात आले. यामध्ये ३०० हून अधिक अर्ज आल्याची माहिती भाजपच्या तालुकाध्यक्षांनी दिली आहे. साधारण प्रत्येक जिल्हा परिषद गटातून जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी २० ते २५ अर्ज प्राप्त झाल्याचे सांगितले आहे.**

### ताकदीने कामाला लागण्याचे आवाहन

**बीड तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्ष पूर्ण ताकदीने लढणार आहे. इच्छुक उमेदवारांची मोठी संख्या ही पक्षाची वाढती ताकद आणि येणाऱ्या विजयाची नांदी आहे. त्यामुळे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकदिलाने, शिस्तबद्ध पद्धतीने काम करून पक्षाला घवघवीत यश मिळवून द्यावे, असे आवाहन भाजपच्या नेत्यांसह पदाधिकाऱ्यांनी केले आहे.**







# जैविक विविधता : मानवी भवितव्याचा अनिवार्य आधार

२९ डिसेंबर रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय जैविक विविधता दिन हा केवळ पर्यावरणीय जाणीव जागविणारा औपचारिक दिवस नसून तो मानवी समाजाच्या अस्तित्वाशी, संस्कृतीशी आणि शाश्वत भविष्यासोबत अतूटपणे जोडलेला आहे. जैविक विविधता म्हणजे पृथ्वीवरील सर्व सजीवसृष्टीतील वैविध्य, वनस्पती, प्राणी, सूक्ष्मजीव, त्यांच्या प्रजाती, जनुकीय वैशिष्ट्ये आणि त्यांना आधार देणाऱ्या परिसंस्था होय. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता जैविक विविधता ही केवळ निसर्गशास्त्रीय संकल्पना नसून मानवी समाजरचना, आर्थिक व्यवहार, सांस्कृतिक मूल्ये आणि राजकीय निर्णय यांचा आरसा आहे. समाज निसर्गाशी जसा वागतो, तशीच त्याची विचारसरणी, सत्तासंबंध आणि विकासाची दिशा स्पष्ट होत जाते. मानवी इतिहासाच्या सुरुवातीपासूनच निसर्ग आणि समाज यांचे नाते परस्परावलंबी राहिले आहे. आदिम समाजात मानव पूर्णतः निसर्गावर अवलंबून होता. अन्न, पाणी, निवारा, औषधे आणि संरक्षण यासाठी जैविक विविधता हाच त्याचा आधार होता. त्यामुळे जंगल, नदी, पर्वत, वृक्ष आणि प्राणी यांना पवित्र मानण्याची परंपरा विकसित झाली. या श्रद्धांमागे अंधविश्वास नव्हे, तर निसर्गसंवर्धनाची सामूहिक सामाजिक जाणीव होती. भारतीय समाजातील लोकसंस्कृती, सण–उत्सव, व्रते, परंपरा आणि लोककथा या निसर्गाशी घट्ट जोडलेल्या आहेत. वड, पिंपळ, तुळस, नाग, गाय यांना दिलेले पावित्र्य हे जैविक विविधतेचे संरक्षण करणारे सामाजिक–सांस्कृतिक साधन होते. समाजाने निसर्गाशी संघर्ष न करता सहजीवनाचा मार्ग स्वीकारला होता. कृषी संस्कृतीच्या उदयानंतर जैविक विविधतेचे सामाजिक महत्त्व अधिक दृढ झाले. पिकांची विविधता, स्थानिक बियाणे, मातीची सुपीकता, पावसाचे चक्र आणि हवामान यावर समाजाची अन्नसुरक्षा आणि आर्थिक स्थैर्य अवलंबून होते. प्रत्येक प्रदेशाने आपल्या भौगोलिक, सामाजिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांनुसार शेतीपद्धती विकसित केल्या. विविध पिके, स्थानिक जाती आणि पारंपरिक शेतीपद्धती यामुळे समाज संकटांना तोंड देऊ शकत होता. समाजशास्त्र सांगते की विविधता ही केवळ परिसंस्थेची नव्हे, तर समाजाच्या टिकावाची मूलभूत अट आहे. एकसुरीपणा निसर्गात जितका धोकादायक आहे, तितकाच तो समाजासाठीही घातक ठरतो.

मात्र औद्योगिक क्रांतीनंतर निसर्ग आणि समाज यांचे नाते मूलभूतपणे बदलले. उत्पादनक्षमता, औद्योगिकीकरण, बाजारव्यवस्था, नफा आणि उपभोग या संकल्पनांनी विकासाची व्याख्या ठरवली. जंगलतोड, खाणउद्योग, मोठे धरण प्रकल्प, रासायनिक शेती, औद्योगिक प्रदूषण आणि अनियंत्रित शहरीकरण यामुळे जैविक विविधतेचा ऱ्हास झपाट्याने होऊ लागला. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता हा ऱ्हास केवळ पर्यावरणीय प्रश्न नसून सामाजिक विषमतेचा परिणाम आहे. विकासाच्या नावाखाली काही मोजके घटक समृद्ध झाले, तर त्याची किंमत गरीब, ग्रामीण, आदिवासी आणि वंचित समाजांना मोजावी लागली. जैविक विविधतेचा ऱ्हास म्हणजे केवळ प्रजातींचा नाश नव्हे, तर उपजीविकेचा ऱ्हास, सांस्कृतिक विस्थापन आणि सामाजिक असुरक्षिततेची प्रक्रिया आहे.

आदिवासी समाज आणि जैविक विविधता यांचे नाते विशेष उल्लेखनीय आहे. जंगल हे आदिवासींसाठी केवळ संसाधन नसून त्यांचे घर, उपजीविकेचे साधन, सामाजिक ओळख आणि आध्यात्मिक विश्व आहे. अन्नसंकलन, पारंपरिक शेती, औषधी वनस्पतींचे ज्ञान, लोककथा, गीतं आणि धार्मिक श्रद्धा या सर्वांचा आधार जैविक विविधतेवर आहे. त्यामुळे अनेक अभ्यासक आदिवासी समाजाला जैविक विविधतेचा नैसर्गिक संरक्षक मानतात. परंतु आधुनिक विकासाच्या नावाखाली या समाजांना विस्थापन, दारिद्र्य आणि सामाजिक बहिष्काराचा सामना करावा लागला. जंगलांचे राष्ट्रीयीकरण, औद्योगिक प्रकल्प, खाणकाम आणि वन्यजीव अभयारण्यांच्या धोरणांमुळे त्यांच्या पारंपरिक हक्कांवर गदा आली. समाजशास्त्र या प्रक्रियेला 'विकासाच्या नावाखाली होणारा सामाजिक अन्याय' असे संबोधते.

जैविक विविधता आणि मानवी उपजीविका यांचे नाते अतिशय घट्ट आहे. जगातील कोट्यवधी लोक अन्न, औषधे, इंधन, चारा, मासेमारी आणि रोजगारासाठी थेट निसर्गावर अवलंबून आहेत. पारंपरिक औषधपद्धती, लोकवैद्यक आणि आयुर्वेद हे जैविक विविधतेच्या ज्ञानावर उभे आहेत. मात्र आधुनिक औद्योगिक व्यवस्था, पेटंट कायदे आणि व्यापारी हितसंबंधांमुळे या पारंपरिक ज्ञानाला दुय्यम स्थान देण्यात आले. परिणामी अनेक वनस्पती प्रजाती नष्ट होत आहेत आणि त्याचबरोबर पिढ्यान्पिढ्या चालत आलेले लोकज्ञानही लुप्त होत आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ही केवळ पर्यावरणीय हानी नसून सांस्कृतिक दारिद्र्याची प्रक्रिया आहे.

शहरी समाज अनेकदा स्वतःला निसर्गापासून वेगळे समजतो, परंतु प्रत्यक्षात शहरांचे अस्तित्वही जैविक विविधतेवरच अवलंबून आहे. पाणी, अन्न, हवा आणि ऊर्जा यासाठी शहरे ग्रामीण भाग आणि नैसर्गिक परिसंस्थांवर विसंबून असतात. तरीही शहरीकरणामुळे हिरवळी नष्ट होतात, नद्या प्रदूषित होतात, ओढे बुजवले जातात आणि स्थानिक प्रजाती लुप्त होतात. वाढते तापमान, पूर, दुष्काळ, प्रदूषणजन्य आजार आणि मानसिक तणाव हे त्याचे थेट परिणाम आहेत. समाजशास्त्र सांगते की निसर्गापासून तुटलेपण ही आधुनिक समाजाची गंभीर समस्या आहे आणि ती सामाजिक तणाव, विषमता व असुरक्षितता वाढवते.

जागतिक पातळीवर जैविक विविधतेचे राजकारणही तितकेच महत्त्वाचे आहे. जैविक संसाधनांवर कोणाचा हक्क, त्यातून होणाऱ्या नफ्याचे वाटप आणि संरक्षणाची जबाबदारी हे प्रश्न सत्तासंबंधांशी जोडलेले आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्या जैविक संसाधनांचे व्यापारीकरण करतात, तर स्थानिक समुदायांना त्यांच्या हक्कांसाठी संघर्ष करावा लागतो. 'जैव–चोरी' ही संकल्पना याच अन्यायातून उदयास आली आहे. समाजशास्त्रीय विश्लेषण जागतिक असमानता, उत्तर–दक्षिण दरी आणि पर्यावरणीय शोषण यांचा परस्परसंबंध स्पष्ट करते.

जैविक विविधतेच्या संरक्षणात महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक समाजांमध्ये महिलाच बियाणे जतन करतात, पाणी व्यवस्थापन करतात, अन्नसंकलन आणि पारंपरिक औषधज्ञान जपतात. मात्र निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग मर्यादित राहतो. पर्यावरणीय धोरणांमध्ये आणि स्थानिक व्यवस्थापनात महिलांचा सक्रिय सहभाग वाढवणे म्हणजे केवळ जैविक विविधतेचे संरक्षण नव्हे, तर सामाजिक समतेच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. समाजशास्त्र लिंगभाव आणि पर्यावरण यातील घनिष्ठ नाते अधोरेखित करते.

आज हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर जैविक विविधतेचे महत्त्व अधिक ठळकपणे समोर आले आहे. विविध प्रजाती आणि परिसंस्था हवामान बदलाशी जुळवून घेण्याची क्षमता वाढवतात. मात्र जैविक विविधतेचा ऱ्हास ही क्षमता कमी करतो आणि नैसर्गिक आपत्ती अधिक तीव्र होतात. त्याचा फटका सर्वाधिक गरीब, वंचित आणि दुर्बल घटकांना बसतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ही परिस्थिती 'पर्यावरणीय अन्याय' दर्शवते, जिथे संकटे सर्वांनी निर्माण केलेली असतात, पण त्याची किंमत काही मोजक्यांनाच मोजावी लागते. आंतरराष्ट्रीय जैविक विविधता दिन साजरा करताना केवळ भाषणे, घोषणा किंवा औपचारिक कार्यक्रम पुरेसे नाहीत. विकासाची संकल्पना पुन्हा तपासण्याची गरज आहे. अमर्याद उपभोग, निसर्गाचे शोषण आणि तात्कालिक नफा याऐवजी शाश्वतता, समतोल, सामाजिक न्याय आणि नैतिक जबाबदारी या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. शिक्षणव्यवस्था, माध्यमे, संशोधन संस्था आणि सामाजिक चळवळी या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. जैविक विविधतेविषयी संवेदनशीलता निर्माण करणे म्हणजे निसर्गाशी मानवी नात्याचे पुनर्निर्माण करणे होय.

समारोप करताना असे म्हणावे लागेल की जैविक विविधता ही निसर्गाची अमूल्य संपत्ती असली तरी तिचे भविष्य मानवी समाजाच्या हातात आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोन आपल्याला हे शिकवतो की निसर्ग आणि समाज यांचे नाते केवळ उपयोगाचे नसून नैतिक जबाबदारीचे आहे. जर आपण आज जैविक विविधतेचे संरक्षण करण्यात अपयशी ठरलो, तर त्याची किंमत येणाऱ्या पिढ्यांना मोजावी लागेल. म्हणूनच *आंतरराष्ट्रीय जैविक विविधता दिन* हा केवळ स्मरणदिन न राहता निसर्ग, समाज आणि मानवतेच्या शाश्वत भविष्याचा सामूहिक संकल्प करण्याचा दिवस ठरावा, हीच काळाची आणि समाजाची खरी गरज आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**

# मद्यपींकरीता सरकारच्या पायघड्या !

ख्रिस्ती नववर्षाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने ३१ डिसेंबरला मद्याची दुकाने रात्री १ वाजेपर्यंत चालू ठेवण्याची परवानगी दिली आहे तर बिअर बार्स, पब्स, क्लब्स आणि परमिट रूम्स यांमध्ये पहाटे पाच वाजे मद्य विक्री करण्याची मुभा देण्यात आली आहे . सरकारच्या या निर्णयामुळे मद्यपींमध्ये उत्साहाचे वातावरण असले, तरी सामान्य जनतेमध्ये संतापाची लाट उसळली आहे. दारूच्या व्यसनामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. अनेकांच्या घरात दारिद्र्य आले आहे. कित्येक पिढ्या बरबाद झाल्या आहेत. दारूमुळे होणारी हानी लक्षात घेऊन अनेक राज्य सरकारांनी आपल्या राज्यात कायमस्वरूपी दारूबंदी केली आहे, असे असताना राज्याच्या सरकारने मद्यपींसाठी घालून दिलेली मोकळीक महाराष्ट्राच्या संस्कृतीला न शोभणारी आहे.

१ जानेवारी हा खरेतर ख्रिस्ती नववर्षारंभ. भारतात इंग्रजांनी अनेक प्रांतांत शेकडो वर्षे राज्य केल्याने आज इंग्रज जाऊन ७८ वर्षे उलटली तरी इंग्रजांच्या वैचारिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीतून आपण अद्याप मुक्त झालेलो नाहीत. तरुण वर्गामध्ये साजरे केलेले जाणारे विविध 'डेज' आणि त्यानिमित्ताने चालणारा स्वैराचार ही त्याचीच विषारी फळे आहेत. भारतात दरवर्षी उत्साहात साजरा केला जाणारा ३१ डिसेंबर हे सुद्धा आपल्यातील वैचारिक गुलामगिरीचेच लक्षण आहे. ३१ डिसेंबरच्या एका रात्रीत लाखो लिटर दारू रिचवली जाते. अति मद्यसेवनामुळे या दिवशी कितीतरी ठिकाणी अपघात घडतात. या अपघातात कितीतरी निरपराधांचे बळी जातात तर कितीतरी आयुष्यभरासाठी जायबंदी होतात. या एका रात्री अनेक ठिकाणी वादावादीचे प्रसंग घडतात त्यामध्ये कित्येकांची डोकी फुटतात. शहरी भागांत ३१ डिसेंबरच्या पार्ट्यांमध्ये वर्षागणिक तरुणींचे प्रमाणही वाढू लागले आहे. सध्याच्या तरुण पिढीवर सिनेकलाकारांचा प्रभाव अधिक असल्याने अशा पार्ट्यांमध्ये कित्येक तरुणी तोकड्या कपड्यांमध्ये वावरताना दिसतात. ३१ डिसेंबरच्या रात्री विनयभंगाचे आणि छेडछाडीचे प्रसंगही मोठ्या प्रमाणात घडतात. ३१ डिसेंबरच्या निमित्ताने शेकडो तरुण अन्य मित्रांच्या हट्टामुळे पहिल्यांदा दारूचा ग्लास ओठाला लावतात आणि त्यातील कितीतरी जण पुढच्या वर्षीच्या ३१ डिसेंबरपर्यंत अट्टल मद्यपी झालेले असतात, अनेक बार आणि पब्समध्ये मद्याच्या नावाखाली अमली पदार्थांचीही विक्री केली जाते. पहाटे पाच वाजेपर्यंत परमिट रूम्स चालू ठेवण्याची शासनाने परवानगी दिल्यामुळे अनैतिक कृत्यांसाठी मोकळे रानच उपलब्ध झाले आहे. या सर्वांचा सर्वाधिक ताण पोलीस प्रशासनावर पडतो. कुणी मद्यपान करून वाहन चालवत नाहीत ना, वाहनांचे वेग मर्यादेत आहेत ना, कुठे अमली पदार्थांची खरेदी–विक्री तर होत नाही ना, हे सर्व पाहण्यासाठी पोलिसांना शहरासारख्या ठिकाणी अधिक कुमक मागवावी लागते. एरव्ही रात्रीच्या वेळी कोणी दारू पिऊन झिंगताना दिसल्यास पोलीस त्याला हटकतात ; मात्र आता सरकारनेच पहाटे ५ वाजेपर्यंत झिंगण्याची परवानगी दिल्याने पोलिसांना रात्रीची गस्त वाढवून मद्यपींची भांडणे सोडवण्यासाठी वेगळा वेळ द्यावा लागणार आहे. या देशात बहुसंख्य हिंदू असून हिंदूंचे नववर्ष हे गुढीपाडव्याला साजरे होते. गुढीपाडवा हा सृष्टीचाही आरंभ दिन आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी नववर्षाचे स्वागत आपण दारी तोरण आणि दाराजवळ गुढी उभारून करतो. पारंपरिक वेशभूषा करून जेष्ठांचे आशीर्वाद घेतो अन समवयस्कांना शुभेच्छा देतो. घरी गोडधोड केले जाते. नववर्षाच्या स्वागतासाठी अनेक ठिकाणी नववर्ष स्वागतयात्रा काढल्या जातात. निसर्गही या दिवसांत बहरलेला असतो. ३१ डिसेंबरच्या रात्री मद्यपान करून नववर्ष साजरे करणे ही खरेतर पाश्चात्यांची कुप्रथा. ही कुप्रथा जोपासून आपणच आपला ऱ्हास करून घेत आहोत. आपल्या राज्यातील जनतेला सर्व प्रकारच्या हानिकारक गोष्टींपासून दूर ठेवणे, कुप्रथांना प्रोत्साहन देणाऱ्यांना शासन करणे आणि राज्याच्या संस्कृतीचा पुरस्कार करणे हे राजाचे आद्यकर्तव्य आहे ; मात्र सध्याचे सरकार हा 'राजधर्म' विसरले आहेत कि काय अशी शंका येते. मद्यविक्रीतून राज्याला मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. नाताल आणि ३१ डिसेंबरच्या निमित्ताने यामध्ये दरवर्षी विक्रमी वाढ झालेली असते. राज्य सरकारमधील दोन प्रमुख पक्ष हे हिंदुत्ववादी विचारसरणीचे संस्कृतीप्रिय पक्ष आहेत त्यामुळे पाश्च्यात्य संस्कृतीच्या या अवडंबराला विद्यमान सरकारकडून देण्यात येत असलेले प्रोत्साहन मनाला खटकणारे आहे. नशेखोरीला आणि अनैतिकतेला प्रोत्साहन देणाऱ्या सनबर्न फेस्टिव्हलला मुंबईत परवानगी देऊन सरकारने आधीच जनतेचा रोष ओढवून घेतला आहे आता ३१ डिसेंबरच्या रात्रीकरीता मद्यपींसाठी सरकारने पायघड्या घातल्याने हा नक्की छत्रपती शिवरायांचाच महाराष्ट्र आहे का ? असा प्रश्न कोणी बाहेरच्यांनी विचारला तर आश्चर्य वाटायला नको.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

◆ पान 9 वरून पुढे...

## अंबाजोगाईकरांना मोठा....

भागातील हजारो ग्राहकांचा वीज पुरवठा आता अधिक सक्षम आणि अखंडित होणार आहे. केज विधानसभा मतदार संघाच्या लोकप्रिय आमदार नमिता मुंदडा यांनी या कामासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. अंबाजोगाई शहरातील वाढती लोकसंख्या आणि विजेची वाढती मागणी लक्षात घेता, जुन्या मोरेवाडी फीडरवर प्रचंड ताण येत होता. यामुळे वारंवार वीज खंडित होणे किंवा कमी दाबाने वीज मिळणे अशा तक्रारी नागरिकांकडून येत होत्या. ही बाब गांभीर्याने घेत आमदार नमिता मुंदडा यांनी शासन स्तरावर आणि महावितरणच्या वरिष्ठ कार्यालयाकडे या फीडरच्या विभाजनासाठी विशेष प्रयत्न केले होते. त्यांच्या या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले असून नवीन फीडरमुळे नागरिकांची वीज समस्येतून सुटका झाली आहे. या नवीन बदलामुळे आता वीज पुरवठ्याचे नियोजन दोन भागांत विभागले गेले आहे. ११ केव्ही मोरेवाडी फीडरवर आता केवळ अंबाजोगाई ग्रामीण शाखेअंतर्गत येणारा भाग असेल. यात यशवंतराव चव्हाण चौक, जयभीम नगर, विद्युत कॉलनी, बी. टी. मोरेनगर, आरकनगर, जुनी मोरेवाडी, मावली नगर, नागशेन नगर, एकात्मता कॉलनी, गणेशनगर आणि संभाजीनगर या भागांचा समावेश आहे. तर, नवनिर्मित ११ केव्ही गवळीपुरा फीडरवरून अंबाजोगाई शहर शाखा क्र. १ अंतर्गत येणारा सदर बाजार, मियाभाई कॉलनी, शेतकी शाळा, येलडा रोड, गवळीपुरा, मिलिंदनगर, गांधीनगर आणि गुरुवार पेठ या भागांना स्वतंत्रपणे वीज पुरवठा केला जाणार आहे.

## मराठी अभिनेत्रीला...

रहिवासी हेमलता आदित्य पाटकर उर्फ हेमलता बाणे (वय ३९ वर्षे) आणि सांताक्रूझ इथल्या रहिवासी अमरिना इक्बाल झवेरी उर्फ एलिस उर्फ अमरिना मॅथ्यू फर्नांडिस (वय ३३ वर्षे) अशी झाली आहे. हेमलता पाटकर या मराठी अभिनेत्री आहेत. पोलिसांनी न्यायालयाला सांगितलं की, हेमलता पाटकर यांच्या विरोधात मेघवाडी पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलम ४५२, ३२३ आणि ५०४ अंतर्गत यापूर्वीच एक फौजदारी गुन्हा दाखल आहे. तपास अधिकाऱ्यांनी न्यायालयाला सांगितलं की, त्यांनी यापूर्वी असे किती गुन्हे केले आहेत, याची पडताळणी करणं आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी वाढीव पोलीस कोठडीची मागणी केली. तपासात सहकार्य नाही– पोलीस: अभियोजन पक्षाच्या म्हणण्यानुसार, खंडणीची रक्कम कशी द्यायची होती, याचा तपशीलवार लेखी पुरावा तक्रारदाराने सादर केला आहे. पोलिसांनी सांगितलं की, हेमलता पाटकर यांचे हस्ताक्षराचे नमुने अद्याप गोळा करायचे आहेत, तर अमरिना झवेरी यांचे आवाजाचे नमुने घेणेही बाकी आहे. तपास अधिकाऱ्यांनी पुढे सांगितलं की, दोन्ही आरोपी महिला तपासात सहकार्य करत नाहीत.

आरोपींनी इतर फरार आरोपींसोबत मिळून इतर पीडितांकडूनही खंडणी उकळली असावी, असाही पोलिसांना संशय आहे. गोरेगाव पश्चिम इथले रहिवासी असलेले तक्रारदार अरविंद गोयल (वय ५२ वर्षे), जे पेशाने बांधकाम व्यावसायिक आहेत, यांनी आरोप केला आहे की, आरोपींनी त्यांच्या मुलावर आंबोली पोलीस ठाण्यात दाखल झालेला फौजदारी खटला मिटवण्यासाठी १० कोटींची मागणी केली. बिल्डरने याप्रकरणे गुन्हे शाखेकडे तक्रार दाखल केली.

## 'प्रियंका घरी...

तसंच आकाश हा वारंवार प्रियंकाच्या चारित्र्यावरही संशय घेत होता. तसंच प्रियंकाला मारहाणही करत होता. प्रियंकाने याबाबत तिच्या माहेरीही कल्पना दिली होती. पती वारंवार त्रास देत असल्यामुळे प्रियंका तीन वर्षांपासून दौंडमध्ये तिच्या भावाच्या घरी राहत होती. आठवड्याभरापूर्वी आकाशने प्रियंकाला फोन करून पुन्हा एकत्र राहण्यासाठी लाडीगोडी लावली. यानंतर प्रियंका पुन्हा पतीसोबत राहायला आली. यानंतर आकाशने प्रियंकाची गळा दाबून हत्या केली. आरोपी आकाश दोडके हा ड्रायव्हर म्हणून काम करतो.

## केजमध्ये महसूल...

तपासण्याचे काम सुरू असून, ट्रॅक्टर चोरणारा आरोपी लवकरच पोलिसांच्या जाळ्यात अडकण्याची शक्यता आहे. या घटनेमुळे सरकारी मालमत्तेच्या आणि जप्त केलेल्या वाहनांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## भाजपा जिल्हा...

३०० हून अधिक इच्छुकांनी निवडणूक लढविण्यासाठी अर्ज दाखल केले आहे. या बैठकीस माजी मंत्री बदामराव पंडित, बाळराजे पवार, भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, डॉ.योगेश क्षीरसागर, जिल्हा सरचिटणीस ड.सर्जेराव तांदळे, भाजपचे निरीक्षक माधव निर्मळ, सतिश मुंडे, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, बीड ग्रामीण मंडळ प्रमुख मनोज पाटील, राणा डोईफोडे, अशोक रसाळ आदी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. निरीक्षकांच्या सूचनेवरून तालुकाध्यक्षांकडे इच्छुकांचे उमेदवारी अर्ज जमा करण्यात आले. यावेळी पदाधिकाऱ्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आगामी निवडणुकांमध्ये पक्षाची संघटनात्मक ताकद, बूथ पातळीवरील नियोजन, कार्यकर्त्यांचा सहभाग, जनतेशी संवाद वाढवण्यावर भर देण्यात आला. बैठकीदरम्यान इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेऊन त्यांच्या कामाचा आढावा, पक्षाशी असलेली निष्ठा, संघटनात्मक अनुभव, निवडणूक तयारीबाबत चर्चा करण्यात आली. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका लक्षात घेता पक्षशिस्त, एकजूट, समन्वय राखून काम करण्याचे आवाहन पदाधिकाऱ्यांनी केले.

◆ पान ४ वरून पुढे...

## माता नर्मदा...

स्वागत करण्यात येणार असून त्यानंतर श्री क्षेत्र नारायणगडपर्यंत भव्य स्वागत रॅलीद्वारे मार्गक्रमण करण्यात येणार आहे. ही स्वागत रॅली गेवराई येथून प्रारंभ होऊन गढी पाडळसिंगी, मादळमोही फाटा, पोखरी फाटा, सिरसमार्ग, पारगाव सिरस, सोनगाव, दिमाखवाडी–साक्षाळ पिंप्री, पौंडुळ फाटा मार्गे श्री क्षेत्र नारायणगड येथे समारोप होणार आहे. माता नर्मदा परिक्रमा पूर्ण केल्याबद्दल गुरुवर्य महंत शिवाजी महाराज यांच्या दर्शनासाठी व स्वागतासाठी परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून श्री क्षेत्र नारायणगड सर्व भक्तगणांच्या वतीने भाविकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या भव्य स्वागत रॅलीत सहभागी होऊन गुरुवर्य महंत शिवाजी महाराजांचे दर्शन व आशीर्वाद घेण्याची संधी साधावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## नवनिर्वाचितांची बॅनरबाजी...

सर्व अनधिकृत बॅनरवर कारवाई केली जाईल असे सांगितले. मात्र प्रत्यक्षात अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली दिसून येत नाही. यामुळे शहराची जबाबदारी सांभाळणाऱ्या नवनिर्वाचित नगरसेवकांनी निवडणूक जिंकली म्हणजे नियम धाब्यावर बसवायचे का? असा सवाल पुन्हा एकदा डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, दि. २९ डिसेंबर (सोमवार) रोजी अनधिकृत बॅनरबाजी करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी नगरपरिषद बीड कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

## मुख्यमंत्री समृद्ध...

ग्रामपंचायत होणार आहे त्याच धर्तीवर आदर्श ग्रामपंचायत बोरफडीने देखील सहभाग नोंदवून सर्व इंडिकेटर पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच अनुषंगाने ग्रामपंचायत बोरफडी चे दप्तर , नाविन्यपूर्ण केलेले कामे व नागरिकांना देत असलेल्या सुख सुविधा हे सर्व पाहण्यासाठी बीड जिल्हा परिषदेचे कर्तव्यदक्ष उपमुख्य कार्यकारी अधिकारी मा. किशोर काळे यांनी त्यांच्या टीम सोबत भेट देऊन समाधान व्यक्त करून गावात शाश्वत विकास करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी त्यांच्यासोबत बीड पंचायत समितीचे विस्तार अधिकारी अरुण मोरे ,मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचे वॉर रूम सनियंत्रक तथा जिल्हा व्यवस्थापक अशोक खरसाडे आदि टीम सहित बोरफडी ग्रामपंचायत चे आदर्श सरपंच कैलास घुगे युवा उद्योजक सुनील कुटे,गोरख घुगे, वचिष्ठ कुटे, बिभीषण घुगे,जयवंत ठोंबरे, कृष्णा घुगे, रामभाऊ गाडे,सिध्देश्वर घुगे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य ग्रामपंचायत अधिकारी विवेक गिते कृषी सहाय्यक खामकर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## जुन्यांना हद्दपार...

आडसकर यांनी आपल्या कामाच्या हातखंड्यावर भाजपाचे टीम कायम सांभाळली आर टी देशमुख आणि रमेश आडसकर यांच्यासाठी जीवाचे रान करणारे कार्यकर्ते भारतीय जनता पार्टीचा मुख्य पार्ट होते आणि आहेत हे माजलगाव तालुका कधीही मान्य करेल मात्र रमेश आडसकर यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादी प्रवेश केल्याने माजलगाव तालुक्यातील भाजपा नेतृत्वहीन झाली होती त्या भारतीय जनता पार्टीला कोण सुधारणार अशी चर्चा माजलगाव तालुक्यात चालू असताना भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी नुकतीच एक बैठक घेऊन कार्यकारणीची निवड केली शंकर देशमुख यांना माजलगाव भारतीय जनता पार्टीचे अबकड ही माहीत नाही त्यांनी जुन्या कार्यकर्त्यांना डावलून नवीन कार्यकर्त्यांच्या गळ्यात पदभाराची माळ टाकली आहे जी भारतीय जनता पार्टी नगरपालिकेत संधी असतानाही यशस्वी होऊ शकली नाही या गोष्टीचा आत्मपरीक्षण करण्यापेक्षा भारतीय जनता पार्टीला नवीन कार्यकारिणीचे डोहाळे लागले होते पूर्ण झाले मात्र होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत यशस्वी बाळ निर्माण होईल का ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे

## केसापुरीच्या जैन...

करून दानपेटीवर हात साफ करण्याचा प्रयत्न केला. दानपेटीचे नुकसान झाले असले तरी आर्थिक हानी टळल्याची प्राथमिक माहिती आहे. दरम्यान सदरील चोरट्यांनी मंदिरातील प्राचीन पितळी मुर्त्या लंपास केल्याचे समजते. सकाळी मंदिर उघडताना सेवेकऱ्यांच्या हा प्रकार लक्षात आला आणि तत्काळ पोलिसांना माहिती देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आहे. दरम्यान पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे. या घटनेमुळे केसापुरी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून धार्मिक स्थळांच्या सुरक्षेचा बोजवारा उडाल्याची तीव्र चर्चा सुरू आहे. दरम्यान यापूर्वीही अज्ञात चोरट्यांनी मंदिरात चोरी करण्याचा प्रयत्न केल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली आहे. देवळेही सुरक्षित नसतील तर सामान्य नागरिकांचं काय? असा संतप्त सवाल करत मंदिर परिसरात तातडीने सुरक्षा वाढवण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

## तलवाडा जि. प...

ऊमेदवारांच्या मुलाखती संदर्भात भव्य बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला बदामराव पंडीत व बाळराजे पवार समर्थकांनी अभूतपूर्व उपस्थिति दर्शवल्याचे या वेळी दिसुन आले. तालुका भरातील ईच्छुकांनी आप आपली नावे नोंदविल्या नंतर तलवाडा जि. प. गट व गणातुन सय्यद मुख्तार अली यांचे नाव निश्चित झाल्याची चर्चा उपस्थित नागरिकातुन ऐकावयास मिळाल्याचे बोलल्या जात आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com



# भयातून विकासाकडे गडचिरोलीची वाटचाल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गडचिरोली पोलीस दलाने गेल्या काही वर्षांत दाखविलेल्या शौर्यामुळे आज गडचिरोलीत भयाचे नव्हे तर विकासाचे, जनतेचे आणि संविधानाचे राज्य प्रस्थापित झाले आहे. या परिवर्तनाची साक्ष म्हणून गडचिरोली महोत्सव सुरू झाला असून, तो जिल्ह्यातील नागरिकांसाठी हक्काचा, अभिव्यक्तीचा आणि सहभागाचा मंच ठरत आहे. कला, क्रीडा, लोकप्रबोधन, नृत्य, गायन आणि मनोरंजन यांच्या माध्यमातून समाजजागृती व सांस्कृतिक एकात्मता साधली जात असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. गडचिरोली पोलीस विभागाच्या पुढाकाराने आयोजित गडचिरोली महोत्सव या सांस्कृतिक कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री तथा गडचिरोलीचे सहपालकमंत्री आशिष जयस्वाल, गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार, खनिकर्म राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती) छेरींग दोरजे, नक्षलविरोधी अभियानाचे विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप



पाटील, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा पोलीस अधीक्षक निलोत्पल, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, तसेच लॉयड्स मेटल्स अ‍ॅण्ड एनर्जी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक बालसुब्रमण्यम प्रभाकरन यांची प्रमुख उपस्थिती होती. मुख्यमंत्री फडणवीस यांनी गडचिरोली पोलीस दलाने एकीकडे माओवादाविरोधात निर्णायक लढा देत जिल्ह्याला जवळपास पूर्णपणे मुक्त केले, तर दुसरीकडे लोकाभिमुखतेतून महसूल प्रशासनासोबत समन्वय साधत राज्य शासनाच्या विविध योजना जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवल्या, असे सांगितले. गडचिरोली जिल्ह्याने भरारी घेतली आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार, उद्योग, पर्यावरण अशा प्रत्येक क्षेत्रात जिल्ह्याची झपाट्याने प्रगती होत आहे. पुढील दहा वर्षांत गडचिरोली महाराष्ट्रातील पहिल्या पाच जिल्ह्यांत असेल, असा विश्वास व्यक्त करत, आगामी काळात दक्षिण भारताचे प्रवेशद्वार म्हणून गडचिरोलीला विकसित करण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. यावेळी सांस्कृती कार्यक्रमात विजेत्यात स्पर्धकांना मुख्यमंत्री यांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा पोलिस अधिक्षक श्री निलोत्पन यांनी केले.

# बीडचा खेळाडू राष्ट्रीय पातळीवर ; तुकाराम करांडे यांची सिनियर खो-खो स्पर्धेसाठी निवड

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील अष्टपैलू खो-खो खेळाडू तुकाराम करांडे यांची तेलंगणा येथे होणाऱ्या सिनियर राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धे साठी निवड झाली आहे. ही प्रतिष्ठेची स्पर्धा जानेवारी २०२६ मध्ये तेलंगणा राज्यात पार पडणार आहे. तुकाराम करांडे यांनी सलग पाच वर्षे बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या संघातून खेळताना सातत्यपूर्ण व उत्कृष्ट कामगिरी



करून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे बीड जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या निवडीबद्दल बीड जिल्हा एमॅच्युअर खो-खो असोसिएशनचे मार्गदर्शक जे. पी. शेळके सर, एमॅच्युअर खो-खो संघटनेचे अध्यक्ष ऋषिकेश शेळके, उपाध्यक्ष रमेश भाऊ शिंदे, सचिव विजय जाहेर, कोषाध्यक्ष योगेश सोळसे तसेच मनोज जोगदंड यांनी तुकाराम करांडे यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. यावेळी मार्गदर्शक जे. पी. शेळके सर बोलताना म्हणाले, तुकाराम करांडे यांनी आतापर्यंत दाखवलेली मेहनत, शिस्त व खेळातील तांत्रिक कौशल्य निश्चितच त्यांना राष्ट्रीय स्तरावर यश मिळवून देईल. त्यांनी बीड जिल्ह्याचे नाव देशपातळीवर उज्वल करावे व भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावरही चमकदार कामगिरी करावी. अशा शब्दांत त्यांनी तुकाराम करांडे यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.



*मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत गाव ढेकणमोह (जाधव वस्ती जवळ)ता.जि.बीड येथे समाजसेवी, सामाजिक कार्यकर्ता, जनसेवक, परोपकारी, जनहितैषी स्वर्गीय रतन नवल टाटा जी यांच्या जन्मदिन निमित्त गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले(स्कूलबॅग, पेन, वही, पेन्सिल)इ.व संस्थेचे सचिव यांनी रतन जी टाटा यांच्या कार्यबद्दल सर्वांना मार्गदर्शन केले.व विद्यार्थी ना पुढील सुलभ भयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी उपस्थित संस्थेचे सचिव तेजस दिलीप पवार, रोहन डोळस, तेजस्विनी पवार, सदस्य तसेच गावकरी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते*

# श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर तीन महिन्याकरिता बंद

**● भाविकांनी सहकार्य करण्याचे पुणे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन**

**पुणे । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरातील सभामंडप व पायरी मार्गाच्या बांधकाम तसेच भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादेत पूर्ण करण्याच्यादृष्टीने मंदिर ९ जानेवारी २०२६ पासून पुढील तीन महिन्यांसाठी महाशिवरात्रीचा कालावधी वगळून भाविकांना दर्शनाकरिता बंद करण्याचा निर्णय श्री क्षेत्र भीमाशंकर संस्थानने घेतला आहे, भाविकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले आहे.

राज्य शासनाने १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष विकास आराखडा मंजुर केला आहे. या आराखड्यातील अत्यंत महत्वाच्या टप्प्याची अंमलबजावणी तसेच प्रत्यक्ष बांधकामाच्या काळातील सुरक्षितता लक्षात घेता २३ डिसेंबर रोजी जिल्हा प्रशासन, श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान संस्थानचे विश्वस्त, स्थानिक दुकानदार व श्री. भीमाशंकर ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठकीत सर्वाच्या सहमतीने मंदिर ९ जानेवारीपासून पुढे तीन महिन्यासाठी (महाशिवरात्रीचा १२ ते १८ फेब्रुवारी २०२६ हा



कालावधी वगळून) तात्पुरते बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. तथापि भाविकांच्या सोयी करिता महाशिवरात्रीच्या कालावधीमध्ये मंदिर दर्शनाकरिता खुले राहणार आहे. सन २०२७ मध्ये त्र्यंबकेश्वर, नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होणार आहे, त्यापूर्वी प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभ २०२५ च्या अनुभवावरून कुंभमेळ्याच्या काळात नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणारे लाखो भाविक श्री क्षेत्र भीमाशंकर येथे दर्शनासाठी येण्याची शक्यता आहे. सुरक्षितता,

# बनावट शिकाऊ वाहन चालक परवाना प्रकरणातील मुख्य आरोपी बिहारमधून अटकेत

**मुंबई । प्रतिनिधी**

बनावट शिकाऊ वाहन चालक परवाना (लर्निंग ड्रायव्हिंग लायसन्स) देण्यासाठी बनावट संकेतस्थळ तयार करून शासकीय संगणक प्रणालीमध्ये अनधिकृत प्रवेश करत नागरिकांची फसवणूक करणाऱ्या टोळीतील मुख्य आरोपीला बिहार राज्यातून अटक करण्यात आली आहे. ही कारवाई जालना स्थानिक गुन्हे शाखा आणि सायबर पोलीस ठाण्याने संयुक्तपणे केली आहे. या प्रकरणी दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी जालना येथील सहायक मोटार वाहन निरीक्षक तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अभिजीत कडुबा बावस्कर यांनी फिर्याद दिली होती. अज्ञात आरोपींनी बनावट संकेतस्थळाच्या माध्यमातून शासकीय प्रक्रियेचा गैरवापर करीत आर्थिक लाभासाठी नागरिकांना बनावट शिकाऊ वाहन चालक परवाना उपलब्ध करून दिल्याचा आरोप आहे. त्यावरून सायबर पोलीस ठाणे, जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक जालना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व सायबर पोलीस ठाण्याचे पथक तयार करण्यात आले. तपासादरम्यान आरोपी नामे बिङ्डराज प्रमोद यादव (वय २४, रा. टेंगराहा, जि. सहरसा, बिहार) हा आपले वास्तव्य वारंवार बदलत असल्याचे निष्पन्न झाले. अखेर दिनांक २३ डिसेंबर २०२५ रोजी पटना, सिमरी बख्तियारपूर व सहरसा परिसरात शोध मोहीम राबवून त्याला ताब्यात घेण्यात आले. आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेला लॅपटॉप, आयफोन, थंब मशीन असा सुमारे १ लाख ४६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक केलेल्या आरोपीस २८ डिसेंबर २०२५ रोजी न्यायालयात हजर केले असता त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या गुन्ह्यात यापूर्वी जम्मू-काश्मीर येथील फैसल बशीर मीर आणि जालना येथील मुजाहिद उर्फ डॉन रईसोद्दीन अन्सारी यांना अटक करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक जालना, अपर पोलीस अधीक्षक तसेच सहरसा जिल्हा पोलीस प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व सायबर पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे पार पाडली, असे परिवहन आयुक्त, मुंबई यांनी कळविले आहे.

# शनि शिंगणापुरात आयुक्तांची 'सिंघम' स्टाईल एन्ट्री; मफलर बांधून दुकानांमध्ये केली चौकशी!

**यरमाळा । प्रतिनिधी**

नाशिक विभागीय आयुक्त तथा शनैश्वर देवस्थानचे प्रशासक डॉ. प्रवीण गेडाम यांनी देवस्थानला अचानक भेट दिली. भाविकाचा वेश परिधान करून त्यांनी पुजा साहित्य व त्यातील अर्थपूर्ण घडामोडी जाणून घेतल्या. शुक्रवारी (ता. २६) रात्री मुक्कामी येऊन त्यांनी शनिवारी दोन तास फेरफटका व तब्बल सात तास बैठका घेत काहींना कडक शब्दात तर काहींना समज देऊन कामकाजाच्या सूचना दिल्या. शुक्रवारी (ता. १९) रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर त्याच दिवशी रात्री नऊ वाजता डॉ. गेडाम यांनी प्रशासक म्हणून पदभार घेत कामकाज सुरु केले होते. उपजिल्हाधिकारी अतुल चोरमारे व प्रांताधिकारी सुधीर पाटील यांची दैनंदिन कामकाज करीता निवड केली होती.




पहिल्याच विभाग प्रमुख बैठकीत डॉ. गेडाम यांची कार्यपद्धत लक्षात आल्याने देवस्थानचे सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी सुताप्रमाणे सरळ झाले होते. येथे भाविकांना होणारा त्रास, अनावश्यक कर्मचारी भरती, बहुतेक विभागात असलेल्या अडचणी पाहून कारभार दोरीत आणण्यासाठी उपाययोजनांची गरज होती. जनसंपर्क कार्यालयात डॉ. गेडाम यांनी विभाग प्रमुखांची बैठक घेऊन काहींची झाडाझडती तर काहींना समज दिली. अतिरिक्त कर्मचारी असलेल्या विभाग प्रमुखावर प्रश्नांची सरबत्ती केली.

डॉ. गेडामांकडून वेषांतर करून पाहणी- आज सकाळी आठ वाजता नाईट पॅण्ट, अंगात स्वेटर व तोंडाला मफलर बांधून आयुक्त डॉ. गेडाम पूजासाहित्य दुकानात गेले. पूजेचे भाव व दर्शन पद्धत जाणून घेतली. त्यांना साडेसाती निवारण पूजेचे ताट ५०० रुपयास सांगण्यात आले. या दरम्यान त्यांनी शेजारच्या दुकानात एक ते दीड हजार रुपयात पूजेचे ताट विकताना पाहिले. याच वेषात त्यांनी दर्शनपथ, मंदीर व चौथरा परिसर, चप्पल स्टँड, सुरक्षेबाबत पाहणी केली.

# जलतरण स्पर्धेतही गेवराईचे विद्यार्थी खेळाडूं झळकतील : रणवीर पंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थी खेळाडूंना क्रिडा क्षेत्रात करिअर करता यावे म्हणून जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेच्या अंतर्गत क्रीडा महोत्सवाचे गेल्या तीन वर्षापासून आयोजन करण्यात येत आहे. क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून तालुक्याच्या ग्रामीण भागातील खेळाडू राज्य व राष्ट्रीय पातळीवर गेले असून या वर्षी जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. जलतरण स्पर्धेतही एक दिवस गेवराई तालुक्यातील खेळाडू देश पातळीवर खेळेल आणि या तालुक्याचा नाव लौकिक होईल असे प्रतिपादन शारदा स्पोर्ट्स अकादमीचे अध्यक्ष रणवीर अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केला. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्था अंतर्गत चौथ्या क्रीडा महोत्सवातील जलतरण स्पर्धेचे उद्घाटन करताना ते बोलत होते. यावेळी जलतरण स्पर्धेत विजेत्या जलतरण स्पर्धकांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या



संकल्पनेतून जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्था अंतर्गत चौथ्या क्रीडा महोत्सवाचा शुभारंभ जलतरण स्पर्धेने झाला. गेवराई येथील नगर परिषदेच्या जलतरण तलाव येथे शनिवार दिनांक २७ डिसेंबर रोजी जलतरण स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, गेवराई वकील संघाचे अध्यक्ष ड. अमित मुळे, डॉक्टर्स असोसिएशन गेवराईचे अध्यक्ष डॉ. अशोक काळे, अ‍ॅड, प्रदीप मडके, सामाजिक कार्यकर्ते महादेव बेंद्रे, संजय भालशंकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सेंट्रल पार्कची कामे गतीने पूर्ण करा : उपमुख्यमंत्री अजित पवार

**उपमुख्यमंत्र्यांकडून शहरातील विकासकामांची पाहणी**

**बारामती । प्रतिनिधी**

प्रशासकीय इमारतीच्या बाजूला नव्याने उभारण्यात येणारे सेंट्रल पार्क ही शहराच्या वैभवात भर पाडणारी वास्तू असून त्याची कामे गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, टिकाऊ आणि गतीने पूर्ण करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री



तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

उपमुख्यमंत्री पवार यांनी इंदापूर रस्ता व बसस्थानक परिसर सुशोभिकरण, सेंट्रल पार्क समोरील रिंगरोड सुशोभिकरण, महापुरुषांच्या पुतळ्याचे काम, जलतरण तलाव, गौतम बाग ते फडतरे वस्ती चौपदरी रस्त्याच्या कामाची पाहणी करुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, सेंट्रल पार्क बाहेरील रिंगरोडचे सुशोभीकरणाची कामे गतीने पूर्ण करावीत. प्रशासकीय इमारत आणि सेंट्रल पार्क दरम्यानच्या संरक्षक भिंतीची उंची वाढवावी. पदपथाच्या आतील बाजूस पाणी साचणार नाही, यादृष्टीने कामे करावीत. सेंट्रल पार्कच्या समोरील जागेवर महापुरुषांचे पुतळे बसविण्याचे काम करण्यात येत असून पुतळ्यांच्या मागील बाजूस आकर्षक भिंतीचे काम करावे. पुतळ्याला हार घालतांना अडचण येणार नाही, यादृष्टीने त्याची उंची घ्यावी.

बसस्थानक परिसरात वाहतूक कोंडी होणार नाही, याकरिता रिक्षा, चारचाकी, दुचाकी यांच्याकरिता पर्यायी जागेचा विचार करावा. इंदापूर रस्त्यावरील जड, अवजड वाहनांच्या रहदारी विचारात घेता वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नगरपरिषद आणि पोलीस प्रशासनाने उपाययोजना कराव्यात. इंदापूर रस्त्याचे सुशोभीकरण करावे. गौतम बाग ते फडतरे वस्ती चारपदरी रस्त्याचे कामे गतीने पूर्ण करावी. कालवा परिसरात उभारण्यात येणाऱ्या जलतरण तलावाच्या कामामध्ये उत्कृष्ट गुणवत्तेचे साहित्य वापरावे. कालवा परिसरात स्वच्छता राहील तसेच गाळ्याच्या दर्शनी भागात नावाचे फलक एकसारखे दिसेल, याबाबत दक्षता घ्यावी. शहरात अधिकाधिक वृक्षारोपण करावे. परिसरातील प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री पवार यांनी दिल्या. यावेळी नगराध्यक्ष सचिन सातव, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, तहसीलदार स्वप्नील रावडे, गट विकास अधिकारी किशोर माने, मुख्याधिकारी पंकज भुसे, उपअभियंता सुभाष पाटील आदी उपस्थित होते.



*बीड व्यापारी संघटनेचे अध्यक्ष श्री. मा संतोष सोहनी यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना दैनिक मराठवाड पत्रचे संपादक दत्तात्रय नरनाळे*


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र




# नवनिर्वाचितांची बॅनरबाजी बोकाळली! बीडकरांच्या जीवाशी खेळ !

**निवडणूक जिंकली म्हणजे नियम पायदळी तुडवायचे का ? वाहतुकीला अडथळा ; नगरपरिषदेचे दुर्लक्ष : डॉ. गणेश ढवळे**

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपरिषद निवडणुकीत जनतेने मोठ्या अपेक्षेने निवडून दिलेल्या नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींनी पदभार स्वीकारण्यापूर्वीच कायदे व नियमांना हरताळ फासल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे. सर्वपक्षीय विजयी उमेदवारांनी सत्तेची धुंदी चढताच कायद्याच्या चौकटीला तिलांजली देत विजयानंतर शहरभर



अनधिकृत बॅनर व होर्डिंग्ज लावून सर्वसामान्य नागरिकांना त्रास दिला जात असल्याचे स्पष्ट होत आहे. निवडणूक जिंकली म्हणजे नियम धाब्यावर बसवायचे का? असा थेट सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी उपस्थित केला आहे.

बीड शहरातील प्रमुख बाजारपेठ असलेल्या सुभाष रोड परिसरात विजेच्या खांबांवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत बॅनर लावण्यात आले आहेत. या बॅनरमुळे दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. काही ठिकाणी तर बॅनर रस्त्यावर झुकल्याने अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. निवडणुकीपूर्वी आचारसंहिता व नियमांचे पाठ वाचवणारी नगरपरिषद, निवडणूक संपताच मात्र या अनधिकृत बॅनरबाजीबाबत पूर्णपणे डोळेझाक करत असल्याचे चित्र आहे. शहर स्वच्छता, सौंदर्यीकरण व नागरिकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी असलेल्या नगरपरिषदेची भूमिका त्यामुळे संशयास्पद ठरत आहे. अनधिकृत बॅनरबाजीबाबत नगरपरिषदेकडे विचारणा केली असता, मुख्याधिकारी, नगरपरिषद बीड यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर

## माता नर्मदा परिक्रमा पूर्ण करून गुरुवर्य महंत शिवाजी महाराज यांचे नारायणगड येथे भव्य आगमन



**बीड । प्रतिनिधी**

माता नर्मदा परिक्रमा यशस्वीरीत्या पूर्ण करून श्री क्षेत्र नारायणगडचे मठाधिपती गुरुवर्य महंत शिवाजी महाराज यांचे मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५ रोजी श्री क्षेत्र नारायणगड येथे भव्य आगमन होणार आहे. या पावन प्रसंगी मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक ८ वाजता गेवराई येथे बाबांचे भक्तिभावाने ▶ उर्वरित पान २ वर

## डॉ.सारिकाताई क्षीरसागर बीडमध्ये फिल्डवर

**● प्रभागातील स्वच्छतेसह इतर कामांना प्रत्यक्ष सुरुवात**

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील प्रभाग १५ मधील स्वच्छता व इतर कामांना प्रत्यक्षात सुरुवात करण्यात आली आहे. भाजपच्या नगरसेविका तथा गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर ह्या शहरात फिल्डवर दिसून आल्या. त्यांनी इतरही सहकारी नगरसेवकांना कामाला लावले आहे. डॉ. सारिकाताई क्षीरसागर म्हणाल्या, प्रभागातील नागरिकांनी दिलेला



विश्वास हेच आपले कवचकुंडल असून, त्या विश्वासाच्या बळावर प्रभागाच्या विकासासाठी सातत्याने काम केले जाईल. यासोबतच बीड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपचे सर्व नगरसेवक लोकांमध्ये राहून, थेट संपर्कातून काम करतील, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. शहरातील बदलत्या परिस्थितीनुसार नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या सूचना, तक्रारी व अपेक्षांचा पाठपुरावा करून त्या पूर्ण होईपर्यंत संबंधित नगरसेवक व कार्यकर्ता कटिबद्ध राहील, असेही त्यांनी म्हटले. बीड हे आपल्या सर्वांचे असून, शहरावर प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. याप्रसंगी सहकारी नगरसेवक सनी माने, नगर परिषदेच्या स्वच्छता विभागातील कर्मचारी तसेच प्रभागातील नागरिक उपस्थित होते.



*हिंदवी परिवाराच्या वतीने महाराष्ट्राचे लोकप्रिय खासदार ओमराजे निंबाळकर यांना सर्वात उंचीचा किल्ला साल्हेर या ठिकाणी राज्यस्तरीय सह्याद्री भूषण पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे प्रसिद्ध शिवव्याख्याते डॉक्टर शिवरत्न शेटे यांच्या हस्ते व महाराष्ट्र आयुष्यमान भारतचे प्रमुख डॉक्टर ओमप्रकाश शेटे,हिंदवी परिवाराचे मार्गदर्शक दुर्ग अभ्यासक श्रीकांतजी कासट,हिंदवी परिवाराचे बीड जिल्ह्याचे प्रमुख व शिवसेना बीड जिल्हा संघटक नितीन भैया धांडे, यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रधान करण्यात आला यावेळी महाराष्ट्र राज्यातून हिंदवी परिवाराचे प्रमुख पदाधिकारी व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री किशोर काळे यांची बोरफडी आदर्श ग्रामपंचायतला भेट

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील आदर्श गाव मौजे बोरफडी येथे शुक्रवार दिनांक २६/१२/२०२५ रोजी सायं.०७:०० वा बीड जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी किशोर काळे साहेब यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतलेल्या आदर्श ग्रामपंचायत बोरफडी येथे भेट देऊन गावात राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची पाहणी करण्यात आली यामध्ये प्लास्टिक बंदी ,बचत गट ,घरकुल,




आयुष्यमान भारत कार्ड वाटप, अनिमिया मुक्त गाव ,ग्रामपंचायत अंतर्गत सीसीटीव्ही कॅमेरे यांसह इतर खासकरून उपक्रम राबवलेले आहेत महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत राज्यात ३७३९७ ग्रामपंचायत तिने सहभाग नोंदवला आहे .जि ग्रामपंचायत उत्कृष्ट काम करील त्या घटकात त्या इंडिकेटर वरती काम करील त्यांना राज्यात पाच कोटी रुपयांचे बक्षीस मिळणार आहे. यामध्ये राज्यस्तरीय जिल्हास्तरीय , तालुकास्तरीय बक्षीसास पात्र ▶▶ उर्वरित पान २ वर

## जुन्यांना हद्दपार नव्या ना दिला पदभार ; माजलगाव भाजपामध्ये निर्माण झाली दरार

**● माजलगाव मध्ये नुकत्याच झालेल्या भाजपा बैठकीत कार्यकर्त्यांची खडा जंगी**

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यामध्ये भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली बैठकीमध्ये नगरपरिषद निवडणुकीमध्ये आलेले अपयश यावर आत्मपरीक्षण करून येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीमध्ये कसे यश मिळेल यासाठी बैठक घेण्यात आली बैठकीमध्ये निष्ठावान कार्यकर्त्यांना डाव लून नवीन कार्यकर्त्यांवर पदांची जबाबदारी दिली यामुळे जुन्या कार्यकर्त्यांना हद्दपार आणि नवीन कार्यकर्त्यांना दिला भाजपाने पदभार अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे कालच्या भाजपा बैठकीत जुन्या आणि नव्या कार्यकर्त्यांमध्ये खडा जंगी पाहायला मिळाली. कै. आर टी देशमुख, यांच्या माध्यमातून माजलगाव तालुक्यामध्ये भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण झाली कधीच नव्हे तो आरती देशमुखाच्या माध्यमातून माजलगाव मध्ये भारतीय जनता पार्टीचा आमदार निवडूनही आला प्रकाश सोळंके यांना जोराची टक्कर देऊन निवडून येणे हा भावली चा खेळ नाही तर आर टी देशमुख यांच्या गोड वाणीची किमया होती काही काळानंतर आर टी देशमुख यांनी माजलगाव कडे दुर्लक्ष केले आणि रमेश आडसकर यांची एन्ट्री झाली रमेश ▶▶ उर्वरित पान २ वर

## केसापुरीच्या जैन मंदिरात चोरी; दानपेटी फोडण्याचा प्रयत्न




**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरापासून जवळच असलेल्या केसापुरीच्या जैन मंदिरात अज्ञात चोरट्यांनी शनिवारी (दि.) मध्यरात्री घुसखोरी करत पितळी मुर्त्या लंपास केल्या असून दानपेटी फोडण्याचा प्रयत्न केल्याने परिसरात संतापाची लाट उसळली आहे. दरम्यान अज्ञात चोरट्या विरोधात पोलिसात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. शनिवारच्या मध्यरात्रीच्या अंधाराचा फायदा घेत चोरट्यांनी मंदिरात प्रवेश ▶ उर्वरित पान २ वर

## सोयाबीन खरेदी नोंदणीला महिनाभराची मुदतवाढ द्यावी; आ. नमिता मुंदडा यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी नाफेडमार्फत होणाऱ्या सोयाबीन खरेदीची नोंदणी मुदत ३१ जानेवारी २०२६ पर्यंत वाढवण्यात यावी, अशी आग्रही मागणी आ. नमिता मुंदडा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. सध्याची मुदत ३१ डिसेंबर रोजी संपत असून, अनेक तांत्रिक कारणांमुळे शेतकरी नोंदणीपासून वंचित राहण्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

आ. नमिता मुंदडा यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या



पत्रात नमूद केले आहे की, यंदा सोयाबीनचे उत्पादन समाधानकारक झाले असले तरी खुल्या बाजारात सोयाबीनला अपेक्षित दर मिळत नाही. बाजारभाव हमीभावापेक्षा खूपच कमी असल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत शासकीय खरेदी केंद्र हाच शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरत आहे. मात्र, नाफेडने नुकतीच काही नवीन खरेदी केंद्रांना मंजुरी दिली आहे. या नवीन केंद्रांवर नोंदणी प्रक्रिया सुरू होण्यास विलंब झाला असून, तेथे मनुष्यबळाची उपलब्धता आणि तांत्रिक प्रशासकीय अडचणींमुळे नोंदणीची गती मंदावली आहे. नोंदणीसाठी आता केवळ काही दिवसांचा कालावधी शिल्लक राहिला आहे. जर ३१ डिसेंबर ही अंतिम तारीख कायम राहिली, तर हजारो शेतकरी शासकीय खरेदीच्या लाभापासून वंचित राहतील. यामुळे शेतकऱ्यांना आपला शेतीमाल नाईलाजाने खुल्या बाजारात कमी दराने विकावा लागेल, परिणामी त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होईल. शेतकऱ्यांचे हे नुकसान टाळण्यासाठी आणि नवीन मंजूर केंद्रांना पूर्ण क्षमतेने काम करण्याची संधी देण्यासाठी ही मुदत ३१ जानेवारी २०२६ पर्यंत वाढवणे आवश्यक असल्याचे मुंदडा यांनी पत्रात म्हटले आहे. या मागणीवर मुख्यमंत्री सकारात्मक निर्णय घेऊन शेतकऱ्यांना न्याय देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

## तलवाडा जि. प. गट व गणातुन सय्यद मुख्तार अली यांची उमेदवारी जवळपास निश्चित !

**तलवाडा । प्रतिनिधी**



गेवराई तालुक्यातील जि. प. व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडनुकिच्या आणुषंगाने गेवराई नगर परिषद निवडनुकी पूर्वी तालुक्यातील ईच्छुक ऊमेदवारांच्या मुलाखती संदर्भात भारतीय जनता पार्टीच्या वतीने गजानन मंगल कार्यालय कोल्हेर रोड गेवराई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. तदनंतर गेवराई नगर परिषदची निवडनुक पार पढली या निवडनुकित बदामराव पंडीत व बाळराजे पवार यांना भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून घवघवीत यश प्राप्त झाल्याने गेवराईसह तालुक्यात संभाव्य जि. प. व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडनुकीच्या आणुषंगाने ऊत्साहचे वातावरण निर्माण झाल्याने भारतीय जनता पार्टीच्या वतीने मा. राज्यमंत्री बदामराव आबा पंडित यांच्या निवासस्थानी पुनच्छ दिनांक २८/१२/२०२५ रोजी ▶▶ उर्वरित पान २ वर

## गव्हर्नमेंट ओबीसी मुलींचे वस्तीगृह बीड येथे फ्रेशर्स पार्टीचे आयोजन मोठ्या उत्साहात



**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील गव्हर्नमेंट ओबीसी मुलीचे वस्तीगृह येथे शैक्षणिक वाटचालीसाठी शिक्षण घेणाऱ्या येथे नवीन येणाऱ्या मुलींच्या स्वागतासाठी एक चांगल्या प्रकारे त्यांचा स्वागत व्हावं या उद्देशाने फोर्सश पार्टीचे आयोजन वस्तीगृह प्रशासनाच्या वतीने आले होते. या कार्यक्रमासाठी खास उपस्थित असलेल्या व सर्व मुलींच्या शैक्षणिक भवित्वाची काळजी घेणाऱ्या व सर्व मुलींना वेळोवेळी उत्कृष्ट असं मोलाचं शैक्षणिक



वाटचालीसाठी कसं पुढे जाता येईल आणि कसं आपल्या परिवाराचं व आपल्या जिल्ह्याचे आपल्या गावाचं आपल्या भारत देशाचा उत्कृष्ट असं चांगल्या प्रकारे शैक्षणिक शिक्षण घेऊन चांगल्या प्रकारे एक नोकरी करून कसे नावलौकिक करता येईल यासाठी वेळोवेळी मुलींना मार्गदर्शन करणाऱ्या अशा समाज कल्याण च्या वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक व लेडी सिंघम म्हणून बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र त्या करत असलेल्या सध्या उत्कृष्ट प्रशासकीय कर्तव्याच्या बाबतीत प्रसिद्ध असलेल्या सीनियर इन्स्पेक्टर कविता गायकवाड मॅडम समाज कल्याण विभाग बीड व बहुजन कल्याण महामंडळाचे वरिष्ठ निरीक्षक लक्ष्मण बारगजे सर समाज कल्याण निरीक्षक ओबीसी महामंडळ व गव्हर्मेंट मुलांची वस्तीग्रह बीड चे गृहपाल लोळगे सर व मुलींचे गव्हर्मेंट होस्टेल बीड ओबीसी गोरमेंट हॉस्टेल बीडच्या गृहपाल येथील सर्व मुलींच्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये शिकत असताना येणाऱ्या सातत्याने अडीअडचणी जाणून घेऊन प्रशासनापर्यंत मांडून सोडून देणारे आशा कर्तव्यदक्ष नवले मॅडम व सर्व ओबीसी गव्हर्मेंट गर्ल्स हॉस्टेल बीड येथील या उच्च शिक्षण घेणाऱ्या या सुसंस्कृत मुली यांनी हा उत्कृष्ट कार्यक्रम आयोजित केला होता व नवीन येथे शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या मुलींना उत्साहात आणि आनंदात जीवन जगण्यासाठी एक उत्कृष्ट प्रेरणा मिळावी या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित केला होता हा कार्यक्रम मोठ्या उत्साहामध्ये आणि आनंदाच्या वातावरणामध्ये संपन्न झाला येथे उच्च शिक्षण घेणाऱ्या सर्व मुलींनी हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न केल्यामुळे इथे उपस्थित असलेल्या समाज कल्याण विभागाच्या वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक कविता गायकवाड मॅडम यांनी व बहुजन समाज कल्याण निरीक्षक लक्ष्मण बारगजे सर यांनी व सर्व येथे उपस्थित असलेल्या सर्व उपस्थित अधिकारी यांनी समाधान व्यक्त केले व येथे उच्च शिक्षण शिकणाऱ्या सर्व मुलींना त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मनस्वी शुभेच्छा दिल्या .